# प्रेसनोट

केंद्र शासनाचे जैविक विविधता कायदा २००२ चे कलम ६३ (१) मध्ये दिलेल्या अधिकाराचा वापर करुन महाराष्ट्र शासनाचे महसूल व वन विभाग अधिसूचना क्रं डब्ल्यूएलपी -१००४/प्र.क्र २२६/फ-१ दि. १०-१२-२००८ अन्वये महाराष्ट्र जैविक विविधता नियम २००८ अधिसुचीत करण्यात आलेली आहे. तसेच जैविक विविधता कायदा २००२ चे कलम २२ मधील तरतुदीनुसार राज्य शासनाने अधिसुचना दिनांक २/१/२०१२ अन्वये महाराष्ट्र राज्य जैवविविधता मंडळाची स्थापना करुन संपुर्ण राज्यात जैविक विविधता कायदा २००२ व महाराष्ट्र जैविक विविधता अधिनियम २००८ ची अंमलबजावणी सुरु केलेली आहे. त्या अनुषंगाने या अधिनियमातील कलम २३ (२) नुसार ग्रामपंचायत (स्थानिक स्वराज्य संस्था) स्तरावर जैविक विविधता व्यवस्थापन समित्या स्थापन करण्यात आलेल्या आहेत.

सदर कायद्यातील तरतुदीनुसार जैविक साधन संपत्तीचे संवर्धन, ती निरंतरपणे टिकून राहील अशा प्रकारे तिचा वापर आणि स्थानिक जैविक विविधतेचा व्यावसायिक वापर होत असल्यास त्याला परवानगी देणे व प्राप्त होणा-या लाभांचे न्यायी/समन्यायी वाटपामध्ये स्थानिकांचा वाटा निश्चित करणे, हि सदर कायद्याची व्याप्ती आहे. त्याअनुषंगाने ग्रामपंचायत स्तरावर स्थापन करण्यात आलेल्या जैविक विविधता व्यवस्थापन समिती अंतर्गत लोक जैविक विविधता नोंदवही (PBR) तयार करण्याची कार्यवाही सुरु करावयाची असून त्यानुषंगाने जिल्हा तांत्रिक सहाय्य गटाची स्थापना करावयाची आहे.

जिल्हा तांत्रिक सहाय्य गटाची स्थापना करण्यासाठी मुख्य कार्यकारी अधिकारी जि.प.सातारा यांचेकडून आवाहन करणेत येते की, याकरीता **जिल्हयामधून कृषिशास्त्र, प्राणीशास्त्र, वनस्पतीशास्त्र, आर्युवेदाचार्य, पशुवैद्यशास्त्र, वन,वन्यजीव, पर्यावरण व जैवविविधता संबंधित तज्ञ व इच्छुक व्यक्तींनी दिनांक १९ ऑक्टोबर २०१९ रोजी सकाळी ११.०० वा. स्थायी समिती सभागृह जिल्हा परिषद सातारा** येथे आपल्या सविस्तर बायोडेटासह उपस्थित राहावे. तसेच **ग्रामपंचायत स्तरावरील लोक जैविक विविधता नोंदवही तयार करण्याकरीता जिल्हयातील ज्या स्वयंसेवी संस्थांकडे तज्ञ मनुष्यबळ उपलब्ध आहे, अशा इच्छुक स्वयंसेवी संस्थांनी त्यांचे अनुभव, त्यांच्याकडील उपलब्ध तज्ञ मनुष्यबळ व आत्तापर्यंत केलेल्या कामास अनुसरुन सादरीकरण करण्यासाठी दि. १९ ऑक्टोबर २०१९ रोजी सकाळी ११.०० वा. स्थायी समिती सभागृह जि.प.सातारा येथे उपस्थित राहावयाचे आहे.** तरी याबाबत इच्छुक व्यक्तींनी व संस्थांनी अधिक माहितीसाठी खालील अधिकारी यांचेशी संपर्क साधावा.

**१)** मा.श्री. अविनाश फडतरे- उपमुख्य कार्यकारी अधिकारी (ग्रापं), जिल्हा परिषद सातारा.- **भ्रमणध्वनी क्रमांक ९७६६९२७६७३**

**२)** मा. श्री.संजिवनी चव्हाण- सहाय्यक वनसंरक्षक, वनविभाग गोडोली, सातारा. **भ्रमणध्वनी क्रमांक ९७६६२४२८५०**

**३)** श्री. संजय जाधव- ग्रामविकास अधिकारी, ग्रामपंचायत विभाग, जिल्हा परिषद सातारा. **भ्रमणध्वनी क्रमांक ९९२३५९२७२७**

SMBhagwat

**(संजय भागवत)**
**मुख्य कार्यकारी अधिकारी जि.प.सातारा तथा**
**सदस्य**
**जैविक विविधता सनियंत्रण समिती**
**सातारा जिल्हा**
**Email- ceozpstr@gmail.com**
भ्रमणध्वनी - ९४२२९९३३३३

Scanned by CamScanner